क्रमांक :-४०३३/ह-२
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक :- मार्च, २०२२.
04 MAR 2022

**:: प रि प त्र क ::**

**विषय :- महाराष्ट्र विधानमंडळाच्या विद्यमान विधानसभा/विधानपरिषद सदस्यांच्या वाहनांसाठी फास्टॅगची (FASTag) सूट देण्याबाबत.**

**संदर्भ :- या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ११९५/ह-२/दिनांकित २१ जानेवारी, २०२२.**

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये "भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांच्या अखत्यारीत असणाऱ्या टोल नाक्यांवर सदर सवलत लागू नसल्याने मा.सदस्यांची होणारी गैरसोय दूर करण्याकरीता सर्व विद्यमान सदस्यांना भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून एक वेगळा फास्टॅग पुरविण्यात येणार आहे. सदरील फास्टॅगमुळे राज्यातील सर्वच टोल नाक्यांवर सदस्यांच्या नोंदणीकृत एका वाहनास पथकरातून सूट मिळणार आहे" असे कळविण्यात आले होते.

उपरोक्त परिपत्रकान्वये ज्या विद्यमान सदस्यांनी विहित नमुन्यातील अर्ज भरलेले नाहीत त्यांनी दिनांक **७ ते १४ मार्च, २०२२** रोजीपर्यंत खालील कागदपत्रे (२ प्रतीत) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयामध्ये कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

(१) पूर्णपणे भरलेला व मा. सदस्यांनी स्वाक्षरी केलेला विहित नमुन्यातील अर्ज (सोबत जोडल्याप्रमाणे)

(२) वाहन नोंदणी पुस्तिकेची (RC Book) छायांकित प्रत.

(३) सन्माननीय सदस्यांच्या सदस्यत्वाच्या ओळखपत्राची छायांकित प्रत

(४) भ्रमणध्वनी क्रमांक (केवळ सन्माननीय सदस्यांचा स्वत:चा)

उपरोक्त प्रमाणे कागदपत्रे या सचिवालयास सादर करु न शकल्यास, सन्माननीय सदस्य भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी व उपरोक्त आवश्यक कागदपत्रांची पूर्तता (upload) करुन फास्टॅग प्राप्त करुन घेऊ शकतात.
पोर्टलची लिंक पुढीलप्रमाणे:-
**https://exemptedfastag.nhai.org/exemptedfastag/images/Applicant Manual.pdf.**

(विलास आठवले)
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति : महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्मा. विद्यमान सदस्य.**

E:\D -1\FASTAG\18-1-2022 meeting\paripatrak.docx